रे.मु. नं. १३५/२०१८

## निशाणी क्रमांक ३४ खालील आदेश

सदरचा अर्ज वादी यांनी वादी क्रमांक १ यांच्या विरुध्द झालेला दावा अबेट झाल्याचा आदेश रद्दबातल करुन मागितलेला आहे.

२. वादीने असे कथन केले आहे की, दाव्यातील वादी क्रमांक १ हे दिनांक २६.०५.२०२२ रोजी मयत झाले आहेत. त्यानंतर प्रकृतीच्या कारणास्तव वादीस वादी क्रमांक १ यांचे वारस वेळेत अभिलेखावर घेता आले नाहीत. जर वादी क्रमांक १ विरुध्द अबेटचा आदेश रद्द केला नाही तर, वादींचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल. सबब, त्यांनी अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

३. प्रतिवादींनी अर्जावरच त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध केला.

४. अर्ज व त्यावरील म्हणण्याचे अवलोकन केले. युक्तीवाद ऐकला.

५. अभिलेखाचे अवलोकन केले असता, सदरचा दावा हा ठरावासाठी आहे. वादी क्रमांक १ यांच्या विरुध्द अबेट आदेश रद्द करण्यासाठी पुरेशे कारण दाखविले आहे. वादीने अर्ज दाखल करण्यास विनाकारण विलंब केलेला आहे असे म्हणण्यास वाव नाही. उभयपक्षांमधील मुळ प्रश्न निकाली काढण्यासाठी व एकाच मुद्दयावर अनेक दावे टाळण्याच्या दृष्टीने प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे गरजेचे आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

आदेश

१. निशाणी क्रमांक ३४ वरील अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादी क्रमांक १ विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द (set aside) करण्यात येतो.

Digitally signed by DESHPANDE PRITESH CHANDRASHEKHAR Date: 2022.12.16 11:27:06 +0530

पेण (प्रितेश देशपांडे)

दिनांक १३.१२.२०२२ सह. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पेण